**MHJN020005722018**

वि.दि.दा.क्र. ३१/२०१८
सुमित वि. लक्ष्मण

## <u>नि.क्र.५८ वरील आदेश</u>

वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेण्यसाठी आदेश २२ नियम ४ सह कलम १५१ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्ज वाचला. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांचे म्हणणे सादर केले. त्यांचे कथन की, सदरचा अर्ज हा खर्चासह मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

३. रेकॉर्डचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ ही दि. ११.०८.२०२५ रोजी मयत झाली असुन तिचे वारस रेकॉर्ड वर घेणे करिता अर्ज केलेला आहे. अर्ज मंजुर केल्यास कोणाचेही कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. सदरचे वारस दाव्यात समाविष्ट केल्याने प्रस्तुत दाव्यात निर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी न्याय व योग्य होईल. त्यामुळे दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ कै. अन्नपुर्णाबाई सारजाजी कारंडे यांचे नावापुढे मयत

हा शब्द वाढवण्यात येउन त्यांचे वारस क्र ३–ए म्हणुन श्रीमती नंदा हरिभाउ खोत, ३–बी म्हणुन निकिता प्रमोदराव शेटे व ३–सी म्हणुन मोहिनी सरजाजी कारंडे या वारसांना रेकॉर्डवर घेणे न्याय व योग्य होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ५८ वरील वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पुढील नेमलेल्या तारखेस दाव्यातील वादी यांनी कै. अन्नपुर्णाबाई सारजाजी कारंडे यांचे वारस ३–ए म्हणुन श्रीमती नंदा हरिभाउ खोत, ३–बी म्हणुन निकिता प्रमोदराव शेटे व ३–सी म्हणुन मोहिनी सरजाजी कारंडे यांना रेकॉर्डवर घेणे बाबतची आवश्यक ती दुरुस्ती करावी.

स्वाक्षरीत/–

दि.२३.०१.२०२६

(श्रीमती ए.पी. दिवाण)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
जालना.